दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/४३

## वृत्तपत्र निवेदन

## परळी येथील खडका बॅरेजमधून पाण्याचा अनधिकृत उपसा : महानिर्मितीचे परिसरातील ग्रामस्थांना आवाहन

महानिर्मितीच्या परळी-वैजनाथ येथील ९२० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज केंद्रासाठी परिसरातील खडका येथे कंपनीतर्फे १९८३ साली बंधारा (बॅरेज) बांधण्यात आले आहे. यातून उपलब्ध होणारे पाणी हे वीजनिर्मिती प्रक्रियेसाठी वापरले जाते. गतवर्षी या भागात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने, पाण्याचा पुरेसा साठा होऊ शकला नाही. तथापि, राज्यातील वीज टंचाई लक्षात घेऊन पुरेश्या पाण्याअभावी वीजनिर्मिती खंडित होऊ नये यासाठी महानिर्मितीने पाटबंधारे विभागाकडून नुकतेच रु. १३.७३ कोटी इतक्या रकमेचे पाणी विकत घेतले आहे. दि. २९ डिसेंबर २००९ पासून खडका बंधाऱ्यात साठवलेले हे पाणी खडक्यापासून १२ कि.मी. दूर मौजे थार शिवारापर्यंत पसरलेले आहे.

तथापि, सदर परिसरात नैसर्गिक पाण्याचा उपसा करण्याकरिता परिसरातील शेतकऱ्यांचे अंदाजे ५०० पंप बसवलेले आढळून आले आहे.

वस्तुत: महानिर्मिती कंपनीने हे पाणी विकत घेऊन साठविले असल्याची माहिती प्रत्येक संबंधित गावांच्या सरपंचामार्फत दि. १६ जानेवारी २०१० रोजी पत्राद्वारे सर्व परिसरवासियांना दिलेली आहे. या पत्रानुसार महानिर्मितीने परिसरातील शेतकऱ्यांना हा अनधिकृत पाणी उपसा थांबविण्याबाबत विनंती केली होती.

तथापि, या विनंतीस संबंधित ग्रामस्थांकडून अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने अखेर निरुपायाने महावितरण कंपनी परभणी कार्यालयामार्फत दि. २७ व २८ जानेवारी रोजी मौजे खडका, शिरसी व कान्हेगांव या गांवातील खडका बंधाऱ्यातून पाण्याचा उपसा करत असलेल्या पंपाचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. परंतु, दि. २८ जानेवारी रोजी सदर ग्रामस्थांनी महावितरणच्या गंगाखेड उपविभागातील सहाय्यक अभियंता यांना घेराव घालून दबावतंत्राने वीजपुरवठा पुन्हा पूर्ववत करुन घेतला आहे.

सध्याच्या खडका बॅरेज साठ्यावरील सुमारे ५०० पंपाची प्रत्येकी किमान ५ अश्वशक्ती व प्रत्येकी सुमारे ४० घनमीटर उपसा क्षमता गृहीत धरल्यास रोज २ लाख घनमीटर पाण्याचा उपसा होत आहे. रोज १० तास हे पंप चालविले जातात, असे गृहित धरल्यास या पाण्याची किंमत रोज रु. २०/- लाख इतकी होते. यामुळे महानिर्मितीचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे सदर पाण्याचा साठा अशा पध्दतीने संपल्यास पाण्याअभावी आगामी काळात परळी औष्णिक वीजकेंद्राची वीजनिर्मिती ठप्प होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. पाण्याचा अनधिकृत उपसा या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन दि. ३१ जानेवारी रोजी संबंधित पोलिस स्टेशनला तक्रार (एफ.आय.आर.) दाखला करण्यात येत असल्याचे महानिर्मितीतर्फे कळविण्यात येत आहे.

---

दिनांक : ३०/०१/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**